# ई-निविदांतर्गत खुली बी-१ निविदा सुचना क्रं.१०/२०२६-२७

## पुणे जिल्हा परिषद पुणे बांधकाम विभाग दक्षिण

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे तर्फे खालील कामाचे नावासमोर रकाना क्र. ७ मध्ये नमुद केलेप्रमाणे ग्रामविकास विभाग/जिल्हा परिषद पुणे यांचेकडिल पंजीकरण केलेल्या योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या ई-निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रुपये | निविदा विक्री किंमत रुपये | बयाणा रक्कम रुपये | कामाची मुदत | नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | लोणीकंद येथील तितिक्षा पार्क येथे रस्ता काँक्रीटीकरण करणे ता.हवेली **(२५१५ १२३८ - ३१- लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे)** | १२४६५४६/- | ५९०/- | १% | १८० दिवस | पुणे जि.प. नोंदणीकृत सर्वसाधारण (खुला) वर्ग १ ते ५ अ पर्यंत |
| २ | लोणीकंद येथील दत्तनगर येथील रस्ता काँक्रीटीकरण करणे ता.हवेली **(२५१५ १२३८ - ३१- लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे)** | १२४६५४६/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प.नोंदणीकृत मजुर सहकारी |
| ३ | कवठे येमाई माळवदेवस्ती ते येमाई देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची सुधारणा ता.शिरूर **(३६०४ ०६२१ - क वर्ग यात्रास्थळ विकास- कार्यक्रम)** | १२४८६२५/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प. नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| ४ | गडदरवाडी मुख्य रस्ता ते उपकेंद्रापर्यंत सिमेंट रस्ता करणे. ता.बरामाती **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १२६०८०४/- | ५९०/- | १% | १८० दिवस | पुणे जि.प. नोंदणीकृत सर्वसाधारण (खुला) वर्ग १ ते ५ अ पर्यंत |
| ५ | पाहुणेवाडी येथील निसर्ग सिटी अंतर्गत रस्ता करणे ता.बरामाती **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १२०६४५३/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प. नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| ६ | सपकळवाडी वाडीवस्ती टप्पा 2 मधील अंतर्गत रस्ता करणे ता. इंदापूर **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १२५७९३३/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प.नोंदणीकृत मजुर सहकारी |
| ७ | तरंगवाडी येथील सरस्वती नगरमध्ये पोळ घर ते कांबळे घर रस्ता काँक्रीट आणि बंदिस्त गटर करणे ता. इंदापूर **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १६४१९९०/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प.नोंदणीकृत मजुर सहकारी |
| ८ | तरंगवाडी सरस्वती नगर बारामती रोड ते भालदार घर रस्ता काँक्रीट करणे. ता.इंदापूर **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १६४१९९०/- | ५९०/- | १% | १८० दिवस | पुणे जि.प. नोंदणीकृत सर्वसाधारण (खुला) वर्ग १ ते ५ अ पर्यंत |
| ९ | सायंबाचीवाडी अंतर्गत रस्ता ते जगतापवस्ती येथील राजेंद्र जगताप घर ते शिवाजी जगताप रस्ता विस्तारीकरण करणे ता.बरामाती **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १६६५८५१/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प.नोंदणीकृत मजुर सहकारी |
| १० | वाणेवाडी येथील चव्हाणवाडी येथे सागर चव्हाण घर ते बाळासो चव्हाण घर तसेच दिनकर चव्हाण घर ते गोरख चव्हाण घर काँक्रीट रस्ता करणे ता. बारामती **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १६७५३८३/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प. नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| ११ | मळद निरावागज हद्दीतील गोकुळनगर फलटण रोड ते माने ढगे वस्ती रस्ता करणे ता.बरामाती **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १२५०२९३/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प. नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| १२ | क-हावागज येथील श्रीरामनगर (धोत्रेवस्ती) रस्ता क्रॉंकीट करणे. ता.बरामाती **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १२४५७१०/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प. नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| १३ | आपटी गावठाण अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे. ता.शिरूर **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १०८५०५०/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प. नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| १४ | रांजणगाव सांडस येथील दर्याचा मळा ते माऊली काळे वस्ती रस्ता करणे ता.शिरूर **(२५१५-१५०५ जनसुविधा)** | १०८५८५३/- | ५९०/- | सूट | १८० दिवस | पुणे जि.प.नोंदणीकृत मजुर सहकारी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | इनामगाव येथे दादा थोरात घर ते गणेगाव रस्ता डांबरीकरण करणे ता.शिरुर जि.पुणे **(२५१५ १२३८ - मुलभूत सुविधा पुरवणे)** | ४११६९५१/- | ५९०/- | १% | १८० दिवस | पुणे जि.प. नोंदणीकृत सर्वसाधारण (खुला) वर्ग १ ते ५ अ पर्यंत |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे**

सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय अज्ञावलीत होईल. सदर निविदेसंदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी, मार्गदर्शक सुचना, शुध्दीपत्रके इत्यादीची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. वरिल कामांचे निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती इ. सदर संकेतस्थळावरुन **दि. १५/०५/२०२६ रोजी दु.०२.०० वाजेपासुन ते दि. २२/०५/२०२६ दु.०३:०० पध्दतीने सादर केलेला लिफाफा क्रं.१ (तांत्रिक लिफाफा) शक्यतो दि.२३/०५/२०२६ रोजी दु.०३:००** वा किंवा कार्यालयीन सोईच्या वेळी http://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर बांधकाम विभाग दक्षिण जि.प.पुणे यांचे कार्यालयात उघडणेत येईल.

२. लघुत्तम निविदा धारकाने कामगारांचा/कारागीरांचा विमा शासकिय निधीकडे उतरविले बाबतची प्रत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहिल. त्याशिवाय कार्यरंभ आदेश दिला जाणार नाही.

३. **एका ई-निविदा जाहिरातीमध्ये एका कंत्राटदारास जास्तीत-जास्त तीन पर्यंतच कामे देता येतील,सदरहू अट तीनही वर्गातील पुणे जि.प.कडील नोंदणीकृत कंत्राटदार यांना बंधनकारक असेल.(खुल्या प्रवर्गास सदरची अट बंधनकारक असणार नाही)**

४. **प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये १.५ कोटी च्या वरील सर्व प्रकारच्या कामांसाठी लागणारी आवश्यक मशिनरी व प्लँट स्वमालकीचा असणे अनिवार्य करणेत येत आहे.**

५. **वरील यादीतील सर्व कामांसाठी -१ % पेक्षा अधिक कमी दर प्राप्त झालेस आशा कामांसाठी Below च्या रक्कमेसाठी धनाकर्ष (डी.डी.) (Demand Draft) अनिवार्य करणेत येत आहे.**(FDR **व** Bank Guarantee **ग्राह्य धरणेत येणार नाही याची नोंद घेणेत यावी.)**

६. **तसेच प्रत्येक कंत्राटदार यांनी .....**

i) **Declaration Of Contractor dated Not Before Date Of Tender Notice Date.**

ii) **१०% पेक्षा जादा कमी दराने एखादी निविदा भरणा करणार असल्यास,त्या कामाचा दर्जा उच्च प्रतीचा राखून काम कसे पूर्ण करणार या बाबतचा खुलासा.**

iii) **बंधपत्र**

**इत्यादी आवश्यक कागदपत्रे आपल्या फर्म च्या नावाचे सुस्पष्ट दिसेल असे लेटर पॅड वरती कंत्राटदाराचे नाव,संपूर्ण पत्ता,ई-मेल संदेश, GST क्रमांक तसेच भ्रमणध्वनी क्रमांक व इतर आवश्यक गोष्टींचा समावेश करून आपल्या अपलोड करण्यात येणाऱ्या कागदपत्रांच्या सोबत जोडणे आवश्यक असणार आहे.**

**निवीदा भरण्यांची कार्यपध्दती -**

**१) तांत्रिक लिफाफा**

(A) प्रस्तुत कामाचे निविदा प्रपत्र डाऊनलोड (Download) केल्याची फी व बयाणा/इसारा रक्कम निविदा सुचना रकाना क्रं. ४ व ५ नुसारच्या रक्कमे प्रमाणे कामनिहाय स्वतंत्रपणे e-Payment Gateway पद्धतीने जमा करणे बंधनकारक आहे. शासन निर्णयाप्रमाणेबयाणा रक्कम सुट प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

(B) Ministry Of Rural Development (M.O.R.D) New Delhi IRC-Sp २०, ६२, ७२ व सा.बां.विभागाचे प्रचलित Specification नुसार कामांची अंमलबजावणी व कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

(C) निवेदतील कामांची तांत्रिक तपासणी ही राज्य शासनाने नेमलेल्या राज्य निरिक्षक (SQM) यांचेकडून होणार असुन, कामांबाबतचे तांत्रिक शेरे पुर्तता संबधित निविदांकारांनी करणे बंधनकारक आहे.

**(D)** सर्व निवीदाधारकांनी निवीदा सादर करतांना जीएसटी नोंदणीप्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक राहिल.

(E) खुल्या प्रवर्गातील कामांसाठी PTR Certificate (FORM I-A) व PTE Certificate(Form II-A) सादर करणे तसेच चालू आर्थिक वर्षातील Clearance Certificate सोबत जोडणे बंधनकारक करणेत येत आहे.

(F) प्राप्तीकर पॅनकार्ड प्रत तसेच फक्त सर्वसाधारण गटातील कामांसाठी मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र **(Assesment Year २०२२-२०२३,२०२३-२०२४,२०२४-२५)** स्कॅन करुन अपलोड करणे बंधनकारक आहे.

(G) **निवीदेतील खुल्या प्रवर्गातील कामांसाठी निवीदांकारांनी शासकिय/निमशासकिय/शासन मान्य संस्थेकडील उपरोक्त** कामासाठी **समान प्रकारचे काम** (similar type of work) **प्रस्तावित कामाच्या ३०% रक्कमेचे किमान तीन काम** (Three single work) **५०% रक्कमेचे किमान दोन काम तसेच ८० % रक्कमेचे किमान एका कामाचे** (similar type of work done) **मागील पाच वर्षात (सन २०२०-२१ ते २०२४-२५) पुर्ण केलेले असावे. त्या बाबतचे संबंधीत कार्यालयाने दिलेले मुळ प्रमाणपत्र** (work done certificate ) **सादर करणे आवश्यक आहे.**

(H) सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना १५ लक्ष वरील सर्व कामांसाठी शासकिय/निमशासकिय/शासन मान्य संस्थेकडील १५ लक्ष रुपये किमतीचे किमान एक काम (One single work) पुर्ण केलेले असावे. त्या बाबतचे संबंधीत कार्यालयाने दिलेले मुळ प्रमाणपत्र (work done certificate ) Work In Hand व Work Completed सह सादर करणे आवश्यक आहे.

**(I) उपरोक्त निविदेतील प्रशासकीय रक्कम रुपये २०.०० लक्ष व त्यावरील सर्व प्रकारच्या डांबरीकरणाच्या कामासाठी निविदाकाराकडे हॉटमिक्स प्लँट , रोलर व इतर आवश्यक मशिनरी तसेच कॉक्रीटीकरणाच्या कामासाठी आर.एम.सी प्लँट , पेव्हर, रोलर व इतर आवश्यक मशिनरी इत्यादी यंत्रसामुग्री पुणे जिल्हयातील स्वमालकीची अथवा कायदेशीररित्या निविदा प्रसिध्दी दिनांका नंतरची,म्हणजेच निविदा कालावधीतील ५००/- रुपये किमतीच्या स्टॅम्प पेपर वरती करारनामा करून भाडयाने घेतलेली असणे आवश्यक असून त्याबाबतची सर्व मूळ कागदपत्रे कामनिहाय स्वतंत्र स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक आहे,तसेच भाडेकराराच्या बाबतीत ज्या एजन्सी कडून प्लँट व मशिनरी बाबत भाडे करार करणेत आलेला असेल त्या संबंधित एजन्सी मालकाचे या-या कामासाठी मी स्वखुशीने ह्या-ह्या एजन्सीसोबत भाडेकरार करून दिलेबाबतचे ५००/- रुपये किंमतीच्या स्टॅम्प पेपर वरती स्वयंघोषणापत्र स्वतंत्ररीत्या स्कॅन करून जोडणे अनिवार्य करणेत येत असून,त्याबाबतची मूळ प्रत कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.**

**(J) निरंक**

**(K)** उपरोक्त कामांसाठी कंत्राटदाराची निविदा भरण्याची क्षमता (बीड कर्पेसिटी)

सनदी लेखापाल यांचेकडून प्रमाणित करुन सादर करावे. तथापी एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षात तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वित्तीय वर्षात पुढील निविदांसाठी बीड कॅपीसीटीची शर्त लागू राहील. या बाबत खातरजमा करण्यासाठी लिफाफा क्र.०१ मध्ये चालू वित्तीय वर्षात हाती घेतलेल्या सर्व कामांची निविदा विषयक माहिती सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

(बीड कर्पेसिटी) : ( अे x एन २) - बी

जेथे अे- गेल्या ५ (पाच) वर्षांतील जास्तीत जास्त वार्षीक उलाढाल (चालू दराने)

एन- देय कामाचा कालावधी

बी - हातातील कामांची किंमती (देय कामांच्या कालावधीतील)

**(L) निविदेसोबत ऑनलाईन अपलोड केलेली सर्व कागदपत्रे खरी असले बाबतचे निविदा प्रसिध्दी दिनांका नंतरचे (निविदा प्रसिद्ध कालावधीतील ) शपथपत्र रक्कम रुपये ५००/- च्या स्टँप पेपरवर सोबत दिलेल्या विहित नमुन्यात सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit) स्वसाक्षांकित तसेच दिनांकीत करुन कामनिहाय स्वतंत्र अपलोड करणे बंधनकारक राहिल. सदर प्रतिज्ञापत्राची मुळ प्रत करारनाम्यासोबत जमा करणे बंधनकारक राहिल.तसेच र रु ५००/- चा स्टँप पेपर कोरा जोडलेला असलेस ग्राह्य धरला जाणार नाही, स्टँप पेपरच्या पहिल्या पानावर किमान संबंधित एजन्सी चे नाव,कामाचे नाव सुस्पष्ट दिसेल असे छापून / उमटवून स्कॅन करून जोडणेत यावा**,तसे नसलेस सदर कामाच्या निविदेप्रक्रियेमधून आपणास अपात्र ठरविणेत येईल.

(M) विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (Declaration of Contractor) स्वाक्षरी करुन अपलोड (Upload) करावे लागेल.

(N) सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी प्रत्येक ई-निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेताना परिशिष्ठ-०२ नुसार बंधपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

(O) निवीदेतील प्रस्तुत कामांसाठी भाववाढ अनुज्ञेय राहणार नाही.

(P)काम प्रगतीत असतांना व पुर्ण झालेनंतर मोजमापे नोंदविणे व देयक तयार करुन कामाची रकम अदा करणेकामी सादर करणे याबाबतीत आवश्यकतेनुसार e-MB कार्यप्रणाली अंतर्गत करणे निवीदाकारांवर बंधनकारक राहिल. म.जि.प. व पं.स.लेखासंहिता १९६८ मधील प्रचलित नियमानुसार कामांस मुदतवाढ देणे, नुकसान भरपाई अथवा दंड आकारणी लावणे व प्रसंगी काम काढून घेणे याबाबतचे सर्व अधिकार मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचे असतील.

(Q)उपरोक्त अ.क्र. **E** ते N मधील कोणतेही एक कागदपत्रे अपलोड (Upload) केलेले नसल्यास वा अपुर्ण / अवैध असल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करणेत येईल व त्याचा व्यापारी लिफाफा उघडण्यांत येणार नाही. तसेच कोणतीही कागदपत्रे (Upload) करण्यांस वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. कागदपत्रांच्या मुळ प्रती स्कॅन करुन अपलोड कराव्यात.

**(R)**प्रस्तुत निविदा सुचनेमधील काम लघुत्तम निविदा धारकास मिळालेनंतर सदर कामाचा कार्यरंभ आदेश निर्गमित झालेचे दिनांकापासुन १ महिन्याचे आत कोणतीही अडचण नसताना प्रत्यक्ष काम सुरु न केलेस कामापोटी घेणेत आलेली अनामत रक्कम जप्त करणेत येईल व नियमाधिन काम काढुन घेणेची कार्यवाही केली जाईल.

(S) **ई-निविदा जाहिरातीमध्ये कामे भरत असताना संबंधित खुल्या वर्गातील ठेकेदार यांनी त्यांची निविदा क्षमता (BID CAPACITY) परिपूर्ण तपासून, म्हणजेच वर्क डन प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य असून, (work in progress and completed certificate) खात्री करूनच निविदेप्रक्रियेत भाग घेणेत यावा, Bid Capacity ही सनदी लेखापाल (C.A) यांचेकडून प्रमाणित केलेलीच ग्राह्य धरणेत येईल व इतर आवश्यक कागदपत्रे या बाबत काही त्रुटी असलेस किंवा सादर केलेली कागदपत्र खोटी असलेचे निष्पन्न झालेस आपणास कोणतीही पूर्व कल्पना न**

**देता निविदा प्रक्रियेतून अपात्र करणेत येऊन, निविदेबाबतची पुढील कार्यवाही पूर्ण करणेत येईल तसेच संबंधित ठेकेदाराचा काळया यादीत समावेश करणेत येईल.**

(T) ईनिविदा जाहिराती-मध्ये कामे भरत असताना संबंधितसु.बे.अ. / मजूर संस्थाच्या ठेकेदार यांची पूर्वी मंजूर कामांपैकी चार (४) किंवा चार (४)पेक्षा अधिक कामे अपूर्ण स्थितीत किंवा प्रलंबित असतील तर आशा परिस्थितीत संबंधित ठेकेदार यांना पुढील यादीतील काम भरणेस अपात्र करणेबाबतचा अंतिम निर्णय निविदा कमिटी चा असेल. एका मजूर संस्थेस / सु.बे.अ यांना एका वर्षामध्ये १०० लक्ष पर्यंतचीच कामे देण्यात येतील, ज्या कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहेत अशा कामांसाठी सुद्धा सदरहू अट लागू राहील.

(U) **तसेच निविदा कारकाने निविदा भरते वेळी निविदा रक्कम रुपये ३० लक्ष वरील सर्व प्रकारच्या कामांसाठी निविदा क्षमता (Bid Capacity) व कामासाठी लागणारे तांत्रिक मनुष्यबळ दाखला हे दोन्हीही Online (QR कोड) असणारे www.mahapwd या वेबसाईट वरून तयार करून घेतलेले जोडणे अनिवार्य करणेत येत आहे.**

(V) **निविदेमधील नमूद कामाच्या BOQ मधील मुख्य घटक (Major Item) म्हणजेच ज्या घटकाची (Item) संख्या जास्त किंवा मोठी असेल त्या घटकाचे वा इतर घटकांचे प्रमाण किमान ३०% Execute केलेले Quantity Certificate सादर करणे आवश्यक आहे.त्यामधील घटक खालीलप्रमाणे असू शकतात.....**

**I) डांबरीकरणाच्या कामासाठी :- WBM,MPM,BM,OGC इत्यादी**

**II) कॉक्रीटीकरणाच्या कामासाठी :- PQC,DLC इत्यादी**

**III) इमारतीच्या कामांसाठी :- M20,M25,Brick Work इत्यादी**

**वरील Item पैकी निविदा सूचनेमधील नमूद कामांच्या BOQ मध्ये समाविष्ट असलेलेच,ज्या-त्या कामांना लागू होणारे Quantity Certificate सोबत जोडणेत यावे.**

**२) व्यापारी लिफाफा -**

१. ई-निवीदे सोबत जोडलेल्या BOQ File मध्ये निविदा धारकाचे नांव व दर नमुद करावा.

**२.** सा.बां विभागाकडील दि.**२७/०९/२०१८** च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. **४.६** नुसार निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा **१०%** पेक्षा अधिक दराने कमी असेल तर एवढया कमी दरात कामाचा दर्जा योग्य राखुन काम कसे पुर्ण याबाबतचा सविस्तर लेखी तपशील स्वाक्षरीसह लिफाफा क्रं.**२** मध्ये विहीत ठिकाणी स्कॅन करुन सादर करावा अन्यथा आपली निविदा अवैध समजणेत येईल.

**३. निविदा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% पेक्षा कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरीटी भरण्याची आवश्यकता नाही.**

**४. निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १% पासुन ते १०% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किंमतीच्या १% एवढया रकमेचा पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा जि.प.पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं.२९/१ या नावाने काढलेला निविदा प्रसिदधीच्या दिनांकानंतरच्या तारखेचा एकत्रीत धनाकर्ष (डी.डी.) (Demand Draft) जो लघुत्तम निविदा धारक असेल त्यानेच निविदा उघडलेपासुन ८ दिवसाचे आत कार्यालयात जमा करावा. अन्यथा सा.बां विभागाकडील दि.२६/११/२०१८ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १ व २ नुसार आपल्याला कोणतीही पूर्व कल्पना न देता सदरची निविदा ही L-२ असणाऱ्या ठेकेदाराला देण्यात येईल.**

५.निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रकमेचा वरील (४) प्रमाणे येणा-या रकमेसह पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं.२९/१ या नावाने काढलेला निविदा प्रसिध्दीचे दिनांकानंतरच्या तारखेचा एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) (Demand Draft) जो लघुत्तम निविदा धारक असेल त्यानेच निविदा उघडलेपासुन ८ दिवसाचे आत कार्यालयात जमा करावा (उदा.१०% पर्यंत कमी दर १% व (१०% ते १५% पर्यंत कमी दराने प्रति टक्का १% दराने) ५% असे एकुण ६% रक्कम)

**६.** निविदा देकार अंदाजपत्रकीय दरपेक्षा १५% पेक्षा कमी दराचा असल्यास देकार १५% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे त्याच्या दोन पटीने वरील (५) प्रमाणे येणा-या रकमेसह पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं.२९/१ या नावाने काढलेला निविदा प्रसिध्दीचे दिनांकानंतरच्या तारखेचा एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) (Demand Draft) जो लघुत्तम निविदा धारक असेल त्यानेच निविदा उघडलेपासुन ८ दिवसाचे आत कार्यालयात जमा करावा (उदा.१५% पर्यंत कमी एकुण ६% रक्कम) व १९% पर्यंत कमी दर (१९% - १५%) ४% ×२ = ८%) असे एकुण १४% रक्कम

**७. व्यापारी लिफाफा क्रं.२ उघडलेनंतर फक्त जो निविदाधारक लघुत्तम निविदाधारक ठरेल त्यानेच धनाकर्ष (Demand Draft) कार्यालयांस तात्काळ ( ८ दिवसांचे आत ) जमा करावयाचा आहे. तसेच लघुत्तम निविदाधारकाने धनाकर्ष ८ दिवसांत कार्यालयांत जमा न केलेस व निवीदा कार्यवाहीसाठी आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणेस कसुर केलेने प्रचलित नियमानुसार संबंधीत लघुत्तम निविदा धारकाची बयाणा रक्कम जप्त करणेत येईल. तसेच जि.प.च्या सर्व विभागांकडील कोणत्याही निविदा प्रक्रियेत भाग घेणेपासून प्रतिबंध केला जाईल याची नोंद घ्यावी. त्यानंतर निविदेबाबत निविदा कमिटी घेईल तो निर्णय निविदाधारकावर बंधनकारक राहिल.**

८.निवीदा प्रक्रिया संपुर्ण संगणकीकृत असलेने ई-प्रणाली व्दारे निवीदा उघडलेचा मेसेज ऑनलाईन येतो, तो पाहण्याची जबाबदारी निवीदाधारकाची असुन त्याबाबत स्वतंतत्र कोणताही पत्रव्यवहार अथवा भ्रमणध्वनीवर कळविले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

९.निवीदा प्रकीयेच्या कोणत्याही टप्प्यांवर अथवा निवीदा मंजुरीनंतर कामाचे कोणत्याही टप्प्यांवर कागदपत्रांच्या विधीग्राहयतेबाबत आक्षेप नोंदविला गेल्यास सदरची बाब कायदेशीर/फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

१०.(अ)पात्र निविदा धारकांकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करतेवेळी कार्यकारी अभियंता बांधकाम दक्षिण विभाग, जिल्हा परिषद पुणे यांचे नांवे ठेव पावती स्वरुपात / चलनाने रोख स्वरुपांत घेतली जाईल व उर्वरीत अनामत रक्कम प्रथम देयकांतुन कपात केली जाईल.

११. निवीदा प्रपत्रातील व नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांवर बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदांपैकी कोणतीही निवीदा अथवा सर्व निवीदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा/ रद्द करणेचा अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असुन निवीदा भरण्या-या कोणत्याही ठेकेदाराला निविदा फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

१२.धनाकर्ष (Demand Draft) शेडुल्ड तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकेची सादर करणे आवश्यक राहील तसेच १% सुरक्षा अनामतीच्या रक्कमेची मुदत दोष दायित्व कालावधीनंतर एक महिना कालावधी पर्यंत असणे बंधनकारक राहील.

१३.ग्राम विकास विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील परिपत्रक ग्रामविमा-२०२५/प्र.क्र.१३४/बांध.-२,दि-२४/०७/२०२५ तसेच मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.जिप/वित्त/मलेप/३५/२०२६ दि-०२/०४/२०२६ मधील सूचनेनुसार कार्यारंभ आदेश प्राप्त होताच ०.५% रक्कम चा कामगार विमा काढणे बंधनकारक राहील.विमा न काढता काही घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबबदारी संबंधित ठेकेदार यांची राहील.तसेच विमा न काढल्यास प्रथम देयकातून १ % रक्कम दंड कपात करण्यात येईल.सबब उपरोक्त नमूद शासन परिपत्रकात नमूद केलेनुसार नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि.पुणे यांचेकडे संबंधित कंत्राटी कामाचा व कामगारांचा नुकसान भरपाई विमा उतरविण्यात यावा.तसे न केल्यास भविष्यात संभावणाऱ्या तक्रारी व अडचणीस संबंधित कंत्राटदार यांना जबाबदार धरणेत येईल.

१४.सदर कामास दोषदायीत्व कालावधी हा १२/२४/३६ महिने राहिल.

सही/-
कार्यकारी अभियंता
बांधकाम दक्षिण विभाग, जि.प.पुणे

सही/-
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद, पुणे

Signature Not Verified

Digitally signed by Amarjeet Maruti Ramshe
Date: 2026.05.15 11:27:38 IST
Location: Maharashtra-MH